राज्यातील १६२५ वस्तीशाळांचे प्राथमिक
शाळेत रुपांतरण करणेबाबत....

# महाराष्ट्र शासन

## शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्र. एसएसए २००८/प्र.क्र. ३४० /प्राशि ४
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २६ ऑगस्ट, २००८.

वाचा- (१) **शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक पीआरई १०९९/(२१७५)/प्राशि १ दि.१८.४.२०००**
(२) **शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक पीआरई २०००/(२१७५)/प्राशि १ दि.२०.३.२००१**
(३) **शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक पीआरई २००३ /(३४८७)/प्राशि १ दि.३०.५.२००३**
(४) **शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक पीआरई २००३/(३६८८)/प्राशि १ दि.२७.११.२००३**
(५) **शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक पीआरई २००३/(२१७५)/प्राशि १ दि.२२.७.२००५**
(६) **शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक पीआरई २००७/(६३१/०७)/प्राशि १ दि.२४.८.२००७**
(७) **शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक एसएसए २००७/प्रक्र ३०१ /प्राशि ४ दि. २७.३.२००८**
(८) **शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक एसएसए २००७/प्रक्र ३०१ /प्राशि ४ दि. २३.६.२००८**

प्रस्तावना -

शासनाने प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे उद्दिष्ट निश्चित केलेले आहे व ते पूर्ण करण्यासाठी शाळेत जाण्यायोग्य वयाच्या सर्व मुलांना शाळेत दाखल करणे आवश्यक आहे. या सर्व बाबींचा विचार करता प्राथमिक शिक्षणाची सुविधा सर्व ठिकाणी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे भारतीय संविधानाच्या अनु. २१ (अ) नुसार प्राथमिक शिक्षणाचा अधिकार हा मुलभूत अधिकार करण्यात आला असून ६ ते १४ वर्ष वयोगटातील सर्व मुला-मुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण देणे ८६ व्या घटनादुरुस्तीव्दारे शासनास बंधनकारक करण्यात आले आहे. प्राथमिक शिक्षणाची ही घटनात्मक जबाबदारी पार पाडण्यासाठी प्रत्येक मुलाला शाळेत दाखल करणे आवश्यक झाल्याने ज्या महसूली गावी, वाड्यात, पाडे, तांड्यात, वस्त्यातून शासनाच्या प्रचलित निकषाप्रमाणे शाळा सुरु करता येत नव्हत्या, अशा ठिकाणी वस्तीशाळा सुरु करण्यासाठी "वस्तीशाळा योजना" संदर्भाधिन दिनांक १८.४.२००० च्या शासन निर्णयान्वये सुरु करण्यात आली. त्यानंतर केंद्र शासनाने सर्व शिक्षा अभियान कार्यक्रम सुरु केल्यानंतर या वस्तीशाळा सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमामध्ये वर्ग करण्यात आल्या. राज्य शासनाने सुरु केलेल्या वस्तीशाळा या प्राथमिक शिक्षणाची दुर्गम भागात करण्यात आलेली तात्पुरती व्यवस्था असल्याने या वस्तीशाळा नियमित प्राथमिक शाळेची गरज पूर्ण करु शकत नाहीत. त्यामुळे दोन वर्ष पूर्ण झालेल्या वस्तीशाळांचे रुपांतर नियमित प्राथमिक शाळेत करण्याचे केंद्रशासनाने अनिवार्य केलले आहे. त्यानुसार संदर्भाधिन दिनांक २७.३.२००८ च्या शासन निर्णयान्वये सन.२००७-०८ या आर्थिक

वर्षामध्ये ३३८४ वस्तीशाळांचे प्राथमिक शाळेत रुपांतरण करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे संदर्भाधिन दिनांक २३.६.२००८ च्या शासन निर्णयान्वये वस्तीशाळा स्वयंसेवकांना या प्राथमिक शाळांमध्ये निमशिक्षक म्हणून कंत्राटी पध्दतीने नियुक्ती देण्याबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. केंद्र शासनाने चालू आर्थिक वर्षामध्ये १६२५ वस्तीशाळांचे प्राथमिक शाळेत रुपांतरण करण्यास मान्यता दिलेली आहे. त्यानुसार धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय -** सन. २००८-०९ या आर्थिक वर्षामध्ये सोबत जोडलेल्या **परिशिष्ट अ** मध्ये जिल्हानिहाय संख्या दर्शविल्याप्रमाणे १६२५ वस्तीशाळांचे प्राथमिक शाळेत रुपांतरण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. दोन वर्षापेक्षा अधिक कालावधीपासून सुरु असणा-या ज्या वस्तीशाळेमध्ये २० पेक्षा अधिक विद्यार्थी पटसंख्या व किमान लोकसंख्या १०० आहे आणि जवळच्या नियमित प्राथमिक शाळेचे अंतर १ कि.मी. पेक्षा अधिक आहे, अशा वस्तीशाळांना प्राथमिक शाळेत रुपांतरण करण्यास प्राधान्य देण्यात यावे. तसेच ज्या वस्तीशाळेमध्ये १ ते १० विद्यार्थी पटसंख्या आहे अशा वस्तीशाळेतील विद्यार्थी जवळच्या नियमित प्राथमिक शाळेत समायोजित करावे व शक्य नसल्यास त्याचे रुपांतर सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमांतर्गत नाविन्यपूर्ण पर्यायी शिक्षण केंद्रात करण्यात यावे.

३. राज्यातील काही जिल्हा परिषदा / ग्रामपंचायती / ग्राम शिक्षण समिती यांनी आपल्या निधीच्या उत्पन्नातून वस्तीशाळेसाठी वर्गखोल्यांचे बांधकाम केलेल्या इमारतीची सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. तसेच शालोपयोगी साहित्य सुध्दा अशा वस्तीशाळांतून उपलब्ध करुन दिलेले आहे. वस्तीशाळेसाठी उपलब्ध करुन दिलेल्या या सर्व भौतिक सुविधा वस्तीशाळेचे नियमित शाळेत रुपांतरण करतांना जिल्हापरिषदांकडे हस्तांतरीत करण्यात याव्यात.

४. वस्तीशाळेचे नियमित प्राथमिक शाळेत रुपांतरीत होणा-या प्रत्येक शाळेकरीता २ वर्गखोल्यांची इमारत व अध्ययन-अध्यापन साहित्य अनुदान, शाळा देखभाल दुरुस्ती अनुदान इ. बाबींसाठी सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमाखाली अनुदान देण्यात येईल. सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमाच्या कालावधीनंतर मात्र या शाळांचे संपूर्ण उत्तरदायित्व राज्य शासनावर राहील.

५. सदर १६२५ वस्तीशाळांचे नियमित प्राथमिक शाळेत रुपांतर करण्यासंदर्भात सविस्तर मार्गदर्शक सुचना महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेमार्फत स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

६.   सदर १६२५ प्राथमिक शाळांमध्ये प्रतिशाळा दोन शिक्षक याप्रमाणे ३२५० प्राथमिक शिक्षकांची पदे निर्माण करण्यास मान्यता देण्यात येत आहे. या पदांवरील खर्च सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमांतर्गत मंजूर तरतदीमधून भागविण्यात यावा. या १६२५ प्राथमिक शाळांमध्ये वस्तीशाळा स्वयंसेवकांना कंत्राटी पध्दतीने नियुक्ती देण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

७.   राज्यामध्ये सुरु असलेल्या वस्तीशाळांचे नियमित प्राथमिक शाळेत रुपांतर केल्यानंतर या नवीन प्राथमिक शाळांमध्ये प्रचलित नियमाप्रमाणे शिक्षकांची दोन पदे (किमान व्दिशिक्षिकी शाळा असे धोरण असल्याने) निर्माण करण्यात आली असली तरी, वस्तीशाळा ज्या ठिकाणी सुरु करण्यात आल्या होत्या ती ठिकाणे ही कमी लोकसंख्येची असल्याने, या प्राथमिक शाळांत इतर शाळांच्या तुलनेत कमी विद्यार्थी राहणार असल्याने या प्राथमिक शाळेतील शिक्षकांच्या दोन पदांपैकी एक पद नियमित शिक्षकांमधून म्हणजे शिक्षण सेवक योजनेमधून किंवा इतर शिक्षकांच्या बदलीने भरण्यात यावे. या शाळेमधील शिक्षकाचे दुसरे पद हे पूर्ण शिक्षक असे न भरता अर्धा शिक्षक असे भरण्यात यावे. या शाळेमधील भरावयाचा अर्धा शिक्षक हा निम-शिक्षक (Para Teacher) असा समजण्यात यावा.

८.   या शाळांमध्ये निमशिक्षकाची पदे ही वस्तीशाळा स्वयंसेवकांमधून कंत्राटी पध्दतीने भरण्यात यावीत. वस्तीशाळा स्वयंसेवकांनी वस्तीशाळेमध्ये शिक्षकाचे काम अनेक वर्षे केलेले असल्याने त्यांचा शिकविण्याचा अनुभव विचारात घेऊन या प्राथमिक शाळांमध्ये वस्तीशाळा स्वयंसेवकांना निमशिक्षक म्हणून वर्षातील दहा महिन्यासाठी करार-तत्वावर (कंत्राटी पध्दतीने) तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती देण्यात यावी.

९.   राज्यातील वस्तीशाळांचे प्राथमिक शाळेत रुपांतरण करण्यास केंद्र शासनाने मान्यता दिलेली असून सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमाचे सन. २००८-०९ चे वार्षिक कार्य अंदाजपत्रकास मान्यता देताना केंद्र शासनाने या प्राथमिक शाळांतील निमशिक्षकास प्रतिमाह रुपये १५००/- एवढे मानधन अदा करण्यास मान्यता दिलेली असल्याने या निशिक्षकांना रुपये १५००/- एवढे मानधन देण्यात यावे.

१०.	जे वस्तीशाळा स्वयंसेवक शासनाने वस्तीशाळा योजना सुरु करतांना तसेच त्यानंतर वेळोवेळी विहित केलेल्या शैक्षणिक अर्हतेप्रमाणे (म्हणजे डी.एड.किंवा किमान १२ वी पास) नियुक्त करण्यात आले आहेत आणि सोबत जोडलेल्या परिशिष्टाप्रमाणे ज्या १६२५ वस्तीशाळांचे प्राथमिक शाळेत रुपांतरण करण्यात आले आहे किंवा ज्या वस्तीशाळा संदर्भाधिन दिनांक २७.३.२००८ च्या शासन निर्णयान्वये बंद करण्यात आल्या आहेत, अशा वस्तीशाळांतील स्वयंसेवकांना या प्राथमिक शाळेत निमशिक्षक (Para teacher) म्हणून तात्पुरत्या स्वरुपात करार तत्वावर नियुक्ती देण्यात यावी.

११.	वस्तीशाळा स्वयंसेवकांमधून करार तत्वावर नियुक्त करण्यात येणा-या निमशिक्षकांना दूर शिक्षणाच्या माध्यमाद्वारे (उदा.पत्राद्वारे) डी.एड.करण्याची संधी देण्यात यावी. तसेच या निमशिक्षकांनी शिक्षण सेवक पदासाठी लागणारी अर्हता प्राप्त केल्यानंतर, त्यांना शिक्षण सेवक पदावर नामनिर्देशनाद्वारे सर्वसाधारण पात्र / अर्हताधारक (डी.एड.) उमेदवारांसोबत करावयाच्या पदभरतीमध्ये निवड प्रक्रियेद्वारे शिक्षण सेवक योजनेत नियुक्ती मिळण्याची संधी देण्यात यावी. त्याचप्रमाणे अशी संधी देत असताना त्यांच्या कामाचा अनुभव विचारात घेऊन त्यांना प्राधान्य देण्यात यावे.

१२.	प्राथमिक शाळेमध्ये वस्तीशाळा स्वयंसेवकामधून नियुक्त करण्यात येणा-या निमशिक्षकांची भविष्यात शिक्षण सेवक पदावर नियुक्ती झाल्यानंतर , अशा प्राथमिक शाळेतील रिक्त होणारे पद हे त्यानंतर पुन्हा निमशिक्षक म्हणून न भरता नियमित शिक्षकामधून म्हणजे शिक्षण सेवक योजनेतून भरण्यात यावे.

१३.	राज्यात सुरु असलेल्या ८६३८ वस्तीशाळांपैकी दिनांक २७.३.२००८ च्या शासन निर्णयान्वये ३३८४ वस्तीशाळांचे प्राथमिक शाळेत रुपांतरण करण्यात आले असून ६८६ वस्तीशाळा बंद करण्यात आल्या आहेत. त्याचप्रमाणे या शासन निर्णयान्वये १६२५ वस्तीशाळांचे प्राथमिक शाळेत रुपांतरण करण्यात येत आहे. त्यामुळे ऊर्वरित २९४३ वस्तीशाळांचे सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमांतर्गत नाविन्यपूर्ण पर्यायी शिक्षण केंद्रामध्ये

रुपांतरण करण्यात यावे. यापुढे वस्तीशाळा योजना बंद करण्यात येत असल्याने नव्याने कोणतीही वस्तीशाळा सुरु करण्यात येऊ नये.

१४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ४७२/२००८, व्यय ५ दि.९/७/२००८ आणि अनौपचारिक संदर्भ क्र.५२७/२००८/व्यय ५, दि.२१/८/२००८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

१५. हे शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या संगणकीय संकेतस्थळावर क्रमांक २००८०८२६११३९३६००१ अन्वये प्रसिध्द करण्यात आले आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

26/8/08

(प्रकाश साबळे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
मुख्यमंत्र्याचे /उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
मंत्री / राज्यमंत्री , शालेय शिक्षण यांचे खाजगी सचिव
सर्व मंत्री / राज्यमंत्री, मंत्रालय मुंबई
शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
शिक्षण संचालक (माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई
सर्व महसूल विभागीय आयुक्त
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक,
शिक्षणाधिकारी (प्राथमिक आणि माध्यमिक), सर्व जिल्हे
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
सर्व मुख्य लेखा परीक्षक
नियोजन विभाग , मंत्रालय, मुंबई
वित्त विभाग , मंत्रालय, मुंबई
ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व मंत्रालयीन विभाग
शालेय शिक्षण विभाग (अर्थसंकल्प)
निवड नस्ती, प्राशि-४

# परिशिष्ट -अ

## (दिनांक २६/८/२००८ च्या शासन निर्णयाचे परिशिष्ट)

## सन २००८-०९ मध्ये नवीन नियमित प्राथमिक शाळेत रुपांतरण करावयाच्या वस्तीशाळांची जिल्हानिहाय संख्या

| अ.क्र. | जिल्हा | नवीन नियमित प्राथमिक शाळेमध्ये रुपांतरण करावयाच्या वस्तीशाळांची संख्या |
|---|---|---|
| १ | अहमदनगर | ४५ |
| २ | अकोला | १ |
| ३ | अमरावती | २ |
| ४ | औरंगाबाद | ६ |
| ५ | बीड | ३८ |
| ६ | भंडारा | निरंक |
| ७ | बुलढाणा | १४ |
| ८ | चंद्रपूर | ५० |
| ९ | धुळे | ९३ |
| १० | गडचिरोली | १०२ |
| ११ | गोंदिया | १९ |
| १२ | हिंगोली | १८ |
| १३ | जळगांव | ३८ |
| १४ | जालना | ५० |
| १५ | कोल्हापूर | ११ |
| १६ | लातूर | ७४ |
| १७ | नागपूर | निरंक |
| १८ | नांदेड | ५३ |
| १९ | नंदुरबार | ८९ |
| २० | नाशिक | १७९ |
| २१ | उस्मानाबाद | ८ |
| २२ | परभणी | २४ |
| २३ | पुणे | ५० |
| २४ | रायगड | २२२ |
| २५ | रत्नागिरी | १४ |
| २६ | सांगली | ८ |
| २७ | सातारा | ३१ |
| २८ | सिंधुदूर्ग | ५ |
| २९ | सोलापूर | १५६ |
| ३० | ठाणे | १२४ |
| ३१ | वर्धा | १४ |
| ३२ | वाशिम | निरंक |
| ३३ | यवतमाळ | ८७ |
|  | एकूण | १,६२५ |

26/8/08